कोकणचं बाणेदार वृत्तपत्र

# कोकणनामा

kokannama.in

KOKANNAMA WEEKLY साप्ताहिक

RNI Regi. No. MAHMAR/2012/48580
Postal Regi. No. RGD/043/2025-2027
Email : kokannama12@gmail.com

मुख्य संपादक : उमाजी म. केळुसकर
मोबा. ९०११३६०१६८

वर्ष : १५, अंक : ३१, पृष्ठे : ४, किंमत : ३ रु., अलिबाग, गुरुवार, दिनांक २४ ते ३० सप्टेंबर २०२६




अनंत चतुर्दशी आणि जीवनाचे अद्भूत तत्त्वज्ञान

पान २



लोकशाहीर राम जोशी! व्ही. शांताराम आणि गदिमा

पान ३



बाप्पांच्या साक्षीने रंगले आगळेवेगळे कवी संमेलन

पान ४

## रायगड जिल्हा परिषदेत मोठी लाचखोरी

# अध्यक्षांच्या स्वीय सहाय्यकाला दीड लाखांची लाच घेताना अटक

**मुंबई, कोकणनामा वृत्त-रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांचे स्वीय सहाय्यक योगेश भस्मे (वय ४६) यांना महिला शिक्षिकेच्या बदलीसाठी तब्बल दीड लाखांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात अटक केली आहे. ही धडक कारवाई बुधवारी (२३ सप्टेंबर) थेट जिल्हा परिषद अध्यक्षांच्या कार्यालयातच करण्यात आली असून, यामुळे प्रशासनिक आणि राजकीय वर्तुळात मोठी खळबळ माजली आहे.**

योगेश भस्मे हे मूळचे रायगड जिल्हा परिषदेच्या अर्थविभागात सहाय्यक लेखाधिकारी म्हणून कार्यरत असण्याबरोबरच ते जिल्हा परिषद अध्यक्षांच्या कार्यालयात स्वीय सहाय्यक म्हणून देखील महत्त्वाची जबाबदारी सांभाळत आहेत. प्रशासकीय यंत्रणेच्या केंद्रस्थानी असलेल्या व्यक्तीवरच लाचखोरीची कारवाई झाल्यामुळे या प्रकरणाचे गांभीर्य अधिक वाढले आहे. या प्रकरणातील तक्रारदाराची पत्नी शिक्षिका असून तिची बदली पोलादपूर येथे झाली होती. मात्र, पोलादपूर येथे बदलीच्या ठिकाणी जाण्याची तिची इच्छा नव्हती. मनासारख्या किंवा सोयीच्या ठिकाणी शाळा मिळावी यासाठी तक्रारदाराने योगेश भसमे यांची भेट घेतली होती.

बदली करून देण्याच्या मोबदल्यात भसमे यांनी तक्रारदाराकडे तब्बल दीड लाख रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचा आरोप आहे. या प्रकारामुळे त्रस्त झालेल्या तक्रारदाराने तात्काळ यासंदर्भात रायगड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे अधिकृत तक्रार दाखल केली. तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेऊन एसीबीच्या पथकाने तात्काळ पडताळणी केली आणि बुधवारी रायगड जिल्हा परिषद अध्यक्षांच्या कार्यालयातच सापळा रचला. ठरल्याप्रमाणे तक्रारदाराकडून दीड लाखांची रोकड स्वीकारताना योगेश



भस्मे यांना पथकाने रंगेहात पकडले आणि ताब्यात घेतले.

प्रशासकीय वर्तुळात गेल्या काही दिवसांपासून शिक्षकांच्या बदल्यांच्या नावाखाली आर्थिक व्यवहार होत असल्याची कुणकुण लागली होती. अखेर एसीबीच्या या कारवाईमुळे या गैरव्यवहाराचा बंडाळी बाहेर आली आहे. विशेष म्हणजे, ही लाच केवळ स्वतःसाठी नसून ती वरिष्ठांसाठी स्वीकारली जात असल्याची चर्चा सध्या जिल्हा परिषदेच्या अंतर्गत वर्तुळात कानाकोपऱ्यात बोलली जात आहे. या प्राथमिक कारवाईनंतर हे लाचखोरीचे जाळे नेमके किती मोठे आहे आणि यामध्ये आणखी कोणाकोणाचा सहभाग असू शकतो, या दिशेने आता कसून तपास सुरू करण्यात आला आहे. शिक्षकांच्या बदल्यांच्या नावाखाली सुरू असलेल्या या बेकायदेशीर आर्थिक व्यवहारांमुळे संपूर्ण शिक्षण व प्रशासन क्षेत्राची मान खाली गेली आहे.

ही यशस्वी धडक कारवाई पोलीस उपअधीक्षक सरिता भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली. या कारवाईमध्ये पोलीस निरीक्षक निशांत धनावडे, पोलीस निरीक्षक नारायण सरोदे, पोलीस उपनिरीक्षक अरुण करकरे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सुषमा राऊळ, हेड कॉन्स्टेबल परम ठाकूर तसेच पोलीस कॉन्स्टेबल नवदीप नांदगावकर यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत सहभाग घेतला. या घटनेमुळे रायगड जिल्हा परिषदेच्या कारभारावर आणि पारदर्शकतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, आगामी काळात या प्रकरणात आणखी कोणकोणते मोठे राजकीय किंवा प्रशासकीय चेहरे उघडकीस येतात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे डोळे लागले आहेत.

शिक्षकांच्या बदल्यांच्या या संपूर्ण प्रकरणामागे आणखी कोणाकोणाचा सहभाग आहे का आणि या रॅकेटचे मूळ कुठेपर्यंत रुजले आहेत, याचा शोध घेण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सखोल तपास सुरू केला आहे. आगामी काळात या प्रकरणात आणखी काही धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



## लायन्स क्लब मांडवाच्या गणपती स्पर्धेत रवींद्र वाघमारे ठरले प्रथम

**अलिबाग, कोकणनामा वृत्त- पर्यावरण संवर्धनाचा संदेश घराघरात पोहोचविण्याच्या उद्देशाने लायन्स क्लब ऑफ अलिबागमांडवा आयोजित आणि पीएमजेएफ ला. अनिल म्हात्रे पुरस्कृत निसर्गस्नेही गणपती मूर्ती व सजावट स्पर्धा अत्यंत उत्साही आणि उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडली. या स्पर्धेसाठी प्राप्त झालेल्या प्रवेशिकांमधून एकूण सोळा स्पर्धकांची प्रत्यक्ष पाहणीसाठी निवड करण्यात आली होती. परीक्षकांनी प्रत्येक स्पर्धकाच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन गणपती मूर्ती, सजावट तसेच निसर्गस्नेही साहित्याचा वापर यांची सूक्ष्म पाहणी करून गुणांकन केले.**

या स्पर्धात्मक उपक्रमात फकीरपाडा येथील रवींद्र बाबू वाघमारे यांनी प्रथम क्रमांक पटकावला, तर बोरीस येथील चंद्रकांत अनंत पाटील यांनी द्वितीय आणि मापगाव येथील मिलिंद चंद्रकांत काठे यांनी तृतीय क्रमांक मिळवला. तसेच नितेश राजाराम घरत (बहिरोळे), साहिल रवींद्र पेढवी (नांदाईपाडा) आणि योगेश प्रकाश वार्डे (रांजणपाडा) यांना उत्तेजनार्थ बक्षिसे जाहीर करण्यात आली.

या स्पर्धेचे परीक्षण एमजेएफ लायन प्रदीप पाटील, एमजेएफ लायन अभिजीत गुरव, लायन सतीश म्हात्रे, लायन सुधीर पुरो आणि लायन प्रीती पाटील या मान्यवरांनी अत्यंत पारदर्शक पद्धतीने पार पाडले. निसर्गस्नेही गणेशोत्सवाची संकल्पना नागरिकांपर्यंत यशस्वीरीत्या पोहोचविणाऱ्या सर्व सहभागी स्पर्धकांचे क्लबतर्फे अभिनंदन करण्यात आले असून, प्रत्यक्ष पाहणीसाठी वेळ देणाऱ्या सर्व परीक्षकांचेही मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

स्पर्धेला मिळालेला हा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता, पुढील वर्षी ही स्पर्धा आणखी भव्यदिव्य स्वरूपात आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणा लायन्स क्लब ऑफ अलिबागमांडवातर्फे करण्यात आली आहे. दरम्यान, बक्षीस समारंभाची तारीख, वेळ व ठिकाण याची माहिती विजेत्या स्पर्धकांशी संपर्क साधून लवकरच स्वतंत्रपणे कळविण्यात येणार आहे.

## महाडमध्ये दीड कोटींची अवैध दारू जप्त

**रायगड-अलिबाग, कोकणनामा वृत्त- मुंबई-गोवा महामार्गावर महाड तालुक्यातील केंबुर्ली येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाने मोठी कारवाई करत अवैध विदेशी मद्यसाठा जप्त केला आहे. हॉटेल निसर्गसमोर सापळा रचून एका बाराचाकी ट्रकची तपासणी केली असता, प्रतिबंधित असलेल्या गोवा राज्य बनावटीच्या रॉयल ब्लू माल्ट विस्कीच्या १८० मिलीच्या सीलबंद बाटल्यांचे तब्बल १ हजार ४८० बॉक्स आढळून आले.**

या धडक कारवाईत १ कोटी ४९ लाख १८ हजार ४०० रुपयांचा मद्यसाठा, १० लाखांचा ट्रक आणि ८ हजार रुपयांचा मोबाईल असा एकूण १ कोटी ५९ लाख २६ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी ट्रकचालक प्रभुलाल भंवरलाल साळवी (वय ३५, रा. भिलवाडा, राजस्थान) याला अटक करण्यात आली असून, त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये महाड उत्पादन शुल्क विभागात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुय्यम निरीक्षक पिसाळ पुढील तपास करत आहेत.

## अलिबागमध्ये नमिता मोटर्सच्या ‘ट्रायम्फ’ शोरूमचा दिमाखात शुभारंभ

**अलिबाग, कोकणनामा वृत्त- अलिबाग येथे नमिता मोटर्सच्या ट्रायम्फ दुचाकी शोरूमचा शुभारंभ बुधवार, २३ सप्टेंबर रोजी उत्साहात करण्यात आला. प्रीमियम मोटरसायकलींसाठी जगभरात ओळख असलेल्या ट्रायम्फ या ब्रिटिश ब्रँडचे अधिकृत शोरूम अलिबागमध्ये सुरू झाल्याने रायगडमधील दुचाकीप्रेमींसाठी आणखी एक पर्याय उपलब्ध झाला आहे. शोरूमचा शुभारंभ माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान वीज व बांधकाम सभापती प्रशांत नाईक यांच्या हस्ते करण्यात आला.**

यावेळी त्यांच्या हस्ते ट्रायम्फच्या पहिल्या दुचाकीची विक्री करण्यात आली. अलिबाग तालुक्यातील वाडगाव फाटा येथील नितीन पेडणेकर यांनी पहिली दुचाकी खरेदी करण्याचा मान मिळवला. प्रशांत नाईक यांच्या हस्ते पेडणेकर यांना दुचाकीची चावी सुपूर्द करण्यात आली.




ट्रायम्फ हा ब्रिटनमधील ऐतिहासिक आणि प्रीमियम मोटरसायकल ब्रँड असून, आकर्षक रचना, दमदार कामगिरी आणि आधुनिक तंत्रज्ञानासाठी तो जगभरात ओळखला जातो. पारंपरिक ब्रिटिश मोटरसायकल वारसा आणि आधुनिक रायडिंग अनुभव यांचा संगम ट्रायम्फच्या विविध मॉडेल्समध्ये पाहायला मिळतो. भारतातील प्रीमियम मोटरसायकल बाजारपेठेतही या ब्रँडने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

नमिता मोटर्सच्या अलिबाग येथील शोरूममध्ये ग्राहकांना ट्रायम्फच्या विविध श्रेणीतील मोटरसायकली उपलब्ध होणार आहेत. यामध्ये स्पीड टी, स्पीड ४००, स्क्रॅम्बलर ४०० एक्स, स्क्रॅम्बलर ४०० एक्ससी, थ्रक्स्टन आणि ट्रॅकर ४०० या मॉडेल्सचा समावेश आहे. शोरूममध्ये उपलब्ध मॉडेल्सच्या दर्शविलेल्या एक्स-शोरूम किमतीनुसार, स्पीड टीची किंमत २ लाख ८ हजार ९७१ रुपये, स्पीड ४००ची २ लाख ३४ हजार १३९ रुपये, स्क्रॅम्बलर ४०० एक्सची २ लाख ६४ हजार ९७८ रुपये, तर स्क्रॅम्बलर ४०० एक्ससीची किंमत २ लाख ९९ हजार ३३३ रुपये आहे. थ्रक्स्टनची किंमत २ लाख ७५ हजार ३३५ रुपये, तर ट्रॅकर ४००ची किंमत २ लाख ४१ हजार ८८२ रुपये आहे.

अलिबागमध्ये ट्रायम्फचे शोरूम सुरू झाल्याने रायगड जिल्ह्यातील ग्राहकांना प्रीमियम मोटरसायकलींची खरेदी आणि संबंधित सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहे. अलिबागसह पेण, मुरुड, रोहा आणि परिसरातील मोटरसायकलप्रेमींनाही या शोरूमचा लाभ घेता येणार आहे. शोरूमच्या शुभारंभानिमित्त दुचाकीप्रेमी, ग्राहक, व्यावसायिक आणि नागरिकांनी उपस्थित राहून नमिता मोटर्सच्या या नव्या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

कोकणचं बाणेदार वृत्तपत्र
कोकणनामा



मुख्य संपादक
उमाजी म. केळुसकर

निवासी संपादक
शरद कोरडे

जाहिरात प्रमुख
विश्वनाथ ग. पाटील

व्यवस्थापिका
सौ. योगिता केळुसकर

ए-१०१, पहिला मजला, गंगाधर को-ऑप. हाऊसिंग सोसायटी, चेंढरे-अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२ २०१
Email : kokannama12@gmail.com

## संपादकीय

# मोकाट कुत्र्यांचा वाढता उपद्रव

आजच्या काळात नागरी जीवितासमोर अनेक प्रश्न उभे ठाकले आहेत, ज्यामध्ये पर्यावरणाचा नाश आणि आरोग्यविषयक समस्यांचा समावेश होतो. परंतु, सध्याच्या घडीला या सगळ्यांच्या पलीकडे जाऊन एका अत्यंत गंभीर समस्येने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले आहे, ती म्हणजे मोकाट कुत्र्यांचा वाढता उपद्रव. विशेषतः सुधागड-पाली सारख्या शहरांमध्ये ही समस्या आता थेट नागरिकांच्या आणि बालकांच्या जीविताशी खेळणारी एक मोठी सुरक्षिततेची समस्या बनली आहे. अशा घटनांमुळे पालकवर्गात आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे व दहशतीचे वातावरण पसरले आहे. पाली शहरातील विविध भागांमध्ये आज मोकाट कुत्र्यांच्या टोळ्या मोठ्या संख्येने फिरताना दिसत आहेत. रस्ते असोत, गल्ल्या असोत किंवा रहिवासी परिसर असो, सर्वत्र या कुत्र्यांचा मुक्त संचार सुरू असतो. नागरिक, वृद्ध आणि लहान मुले यांना या भीतीच्या सावटाखाली जगताना रोज तारेवरची कसरत करावी लागत आहे. लहान मुले खेळण्यासाठी घराबाहेर पडतात किंवा शाळा, ट्युशनसाठी ये-जा करतात, तेव्हा त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर येतो. सध्या वर्दळीचे दिवस असल्याने मुलांची घराबाहेर पडण्याची रेलचेल वाढलेली असते. अशा वेळी अंधार झाल्यावर शाळेतून घरी परतणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न अधिकच गंभीर बनतो. कुत्र्यांच्या हिंसक वागणुकीमुळे कधी कोणावर हल्ला होईल आणि कोणाला दुखापत होईल, याचा नेम राहिलेला नाही. या समस्येचे मूळ कारण म्हणजे स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष आणि योग्य वेळी ठोस उपाययोजना न राबवणे हे आहे. नागरिकांकडून वारंवार तक्रारी करूनही प्रशासकीय यंत्रणा योग्य त्या गांभीर्याने पावले उचलत नाही, ही सर्वसामान्य नागरिकांची भावना आहे. ज्या भागांमध्ये मोकाट कुत्र्यांचा वावर सर्वाधिक आहे, तिथे तातडीने पाहणी करून नसबंदी किंवा इतर आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे आहे. पाली नगरपंचायतीने या गंभीर प्रकारची तात्काळ दखल घ्यावी, जेणेकरून लहान मुलांची सुरक्षा अबाधित राखली जाऊ शकेल. केवळ एका परिसरापुरती मर्यादित न राहता संपूर्ण शहरातील मोकाट कुत्र्यांच्या त्रासाकडे गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे. ज्या ठिकाणी कुत्र्यांची संख्या जास्त आहे, तिथे विशेष पथके नेमून त्यांना सुरक्षित ठिकाणी हलवणे किंवा त्यांच्या नियंत्रणासाठी नियोजनबद्ध मोहीम राबवणे हाच शाश्वत उपाय ठरू शकतो. नागरिकांच्या मूलभूत हक्कांपैकी सुरक्षित जगण्याचा हक्क हा सर्वांत वरचा असून, मोकाट कुत्र्यांच्या दहशतीमुळे जर नागरिकांना आपल्याच शहरात असुरक्षित वाटत असेल, तर ते प्रशासकीय अपयश मानले जावे लागेल. आता वेळ आली आहे की प्रशासनाने कोणत्याही मोठ्या दुर्घटनेची वाट न बघता तातडीने पावले उचलावीत आणि या कुत्र्यांचा बंदोबस्त करून नागरिकांना भयमुक्त जीवन मिळवून द्यावे.



वास्तव

उमाजी म. केळुसकर

# एस.टी.चे एन.सी.एम.सी. कार्ड की लूट?

**लोकशाहीच्या पवित्र मंदिरात मतांच्या झोळी भरण्यासाठी घोषणांचे पाऊस पाडायचे आणि निवडणुका संपताच सामान्यांच्या हक्कांवर आणि खिशावर डल्ला मारायचा, हा सध्याच्या राजकारणाचा ठरलेला शिरस्ता बनला आहे. महाराष्ट्रात अलीकडेच गाजलेली महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी एस.टी. बसच्या प्रवासातील ५० टक्के सवलतीची घोषणा हा याच राजकीय धोरणाचा एक भाग होता. सुरुवातीला अत्यंत सहज आणि सुलभ असणाऱ्या या योजनेला आता प्रशासकीय लालफितीचा आणि पैशांच्या वसुलीचा विळखा घातला गेला आहे. निवडणुकांचे टार्गेट पूर्ण झाल्यावर, आता एन.सी.एम.सी. कार्डच्या नावाखाली प्रवाशांच्या खिशाला २०० रुपयांची सक्तीची कात्री लावली जात आहे. डिजिटल इंडियाच्या नावाखाली सरळसरळ आर्थिक शोषण आहे.**

लोकशाहीच्या पवित्र मंदिरात मतांच्या झोळी भरण्यासाठी घोषणांचे पाऊस पाडायचे आणि निवडणुका संपताच सामान्यांच्या हक्कांवर आणि खिशावर डल्ला मारायचा, हा सध्याच्या राजकारणाचा ठरलेला शिरस्ता बनला आहे. महाराष्ट्रात अलीकडेच गाजलेली महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी एस.टी. बसच्या प्रवासातील ५० टक्के सवलतीची घोषणा हा याच राजकीय धोरणाचा एक भाग होता. सुरुवातीला अत्यंत सहज आणि सुलभ असणाऱ्या या योजनेला आता प्रशासकीय लालफितीचा आणि पैशांच्या वसुलीचा विळखा घातला गेला आहे. निवडणुकांचे टार्गेट पूर्ण झाल्यावर, आता एन.सी.एम.सी. कार्डच्या नावाखाली प्रवाशांच्या खिशाला २०० रुपयांची सक्तीची कात्री लावली जात आहे. डिजिटल इंडियाच्या नावाखाली सरळसरळ आर्थिक शोषण आहे. सवलतींचे आमिष दाखवून नंतर वेगवेगळ्या शुल्कांच्या जाळ्यात अडकवणाऱ्या या धोरणामुळे महाराष्ट्रातील गोरगरीब, शेतकरी आणि सर्वसामान्य प्रवासी वर्गात तीव्र संतापाची लाट उसळणे साहजिकच आहे.

लोकशाही व्यवस्थेत निवडणुका येतात आणि जातात, राजकीय पक्ष आपली आश्वासनांची पोती रिकामी करतात आणि मतांचे गणित जुळवून सत्तेवर आरूढ होतात. परंतु, निवडणुकीच्या काळात जनतेच्या डोळ्यात फेसाळलेली आश्वासनांची धूलफेक निवडणुकीचा निकाल लागताच कशी खाली होते, याचे उत्तम उदाहरण सध्या महाराष्ट्रातील सार्वजनिक परिवहन व्यवस्थेत पाहायला मिळत आहे. निवडणुकीच्या तोंडावर राज्यातील सर्व महिला भगिनींसाठी एस.टी. बसच्या प्रवासात ५० टक्के सवलत देणारी 'अर्धे तिकीट' योजना जाहीर करण्यात आली. पाठोपाठ ज्येष्ठ नागरिकांसाठीही हीच सवलत लागू करण्यात आली. या दोन्ही योजनांसाठी सुरुवातीला आधार कार्ड किंवा ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र ग्राह्य धरले जात होते. ही प्रक्रिया अतिशय सहज, सरळ आणि सर्वसामान्यांना कोणतीही कटकट न करणारी होती. ज्या उद्देशाने ही घोषणा करण्यात आली होती, त्या निवडणुकांमध्ये सत्ताधाऱ्यांना त्याचा हवा तसा राजकीय फायदा मिळाला, विरोधकांना चितपट केले आणि राजकारण्यांच्या गळ्यात यशाची माला पडली. परंतु, निवडणुका संपल्या, सत्तेची चूल पेटली की



सामान्यांच्या तोंडाला पाने पुसण्याची जुनी सवय या सरकारला सुटली नाही, हेच आता एस.टी. महामंडळाच्या 'एन.सी.एम.सी.' सक्तीवरून स्पष्ट होत आहे.

निवडणुकांचे काम फत्ते झाल्यानंतर, आता एस.टी. महामंडळ, परिवहन मंत्रालय आणि वातानुकूलित कार्यालयांमध्ये मखमली खुर्च्यांवर बसून जनतेच्या घामाच्या पैशांवर डोळा ठेवून बसलेल्या काही उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना एक नवीन शक्कल सुचली. ती म्हणजे 'एन.सी.एम.सी.' (नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड) ची सक्ती. महामंडळाने ही डिजिटल कार्ड नोंदणी मोहीम १ एप्रिल २०२६ पासून अधिकृतपणे सुरू केली, आणि आता प्रवाशांना या सवलतीचा लाभ घेण्यासाठी ३० सप्टेंबर २०२६ पर्यंतची मुदत वाढवून देण्यात आली आहे. या मुदतवाढीचा खेळ म्हणजे सामान्यांच्या डोळ्यात माती फेकण्याचा आणखी एक प्रकार आहे. आज गोरगरीब प्रवासी, शेतकरी, मजूर, महिला आणि ज्येष्ठ नागरिक या सवलतींचा लाभ घेत आहेत. पण हे कार्ड बनवून देनेच्या नावाखाली प्रत्येक लाभधारकाकडून सर्रास रु.२००/- सक्तीने वसूल केले जात आहेत. आजच्या या महागाईच्या काळात आधीच मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या वर्गाला एन.सी.एम.सी. कार्डच्या नावाखाली भुर्दंड सोसावा लागत आहे. ही सक्ती केवळ आर्थिक लुटमार नसून, जनतेच्या विश्वासाला तडा देणारी नीती आहे. सवलतींचे आमिष दाखवून नंतर छुपे कर किंवा शुल्क लादणे हा हुकूमशाहीचाच एक भाग वाटतो. ज्या महिला संसाराचा गाडा हाकण्यासाठी पैकी-पैकीचा हिसाब करतात, त्यांच्याच खिशाला कात्री लावून हे पैसे वसूल करणे कितपत न्याय्य आहे? एका हाताने सवलतीचे ५० टक्के पैसे माफ करायचे आणि दुसऱ्या हाताने कार्डच्या नावाखाली तोच पैसा वेगवेगळ्या शुल्कांच्या माध्यमातून पुन्हा वसूल करायचा, हा सरळसरळ जनतेच्या डोळ्यात धूळफेक करून केला जाणारा आर्थिक दरोडा नाही का? जर सरकारला ही सवलत देता येत नसेल, किंवा त्यासाठी वारंवार आर्थिक ताण येत असेल, तर मग अशा घोषणांचा निव्वळ 'इलेक्शन स्टंट' कशाला करता? गोरगरीब प्रवाशांच्या सहानुभूतीचा वापर करून मते लाटायची आणि नंतर विविध कायदे व कार्डच्या जाळ्यात त्यांना अडकवून त्यांच्याच खिशातील पैसे पुन्हा लुटायचे, असे संतापजनक आणि असंवेदनशील सरकार, मंत्री आणि अधिकारी महाराष्ट्राने यापूर्वी कधीही पाहिले नव्हते.

या एन.सी.एम.सी. कार्डच्या नावाखाली चाललेला सावळागोंधळ केवळ पैशांच्या वसुलीपुरता मर्यादित नाही, तर तो डिजिटल गुलामगिरीकडे नेणारा एक मोठा घाट आहे. महाराष्ट्रात अजूनही हजारो खेडी अशी आहेत जिथे इंटरनेटची पुरेशी कनेक्टिव्हिटी नाही, स्मार्ट मोबाईल दूरची गोष्ट, अनेक ज्येष्ठ नागरिकांना साधे एटीएम कार्ड वापरणे किंवा ऑनलाईन व्यवहार करणे आजही अवगत नाही. अशा परिस्थितीत ग्रामीण भागातील साध्याभोळ्या जनतेवर हे डिजिटल कार्ड लादणे म्हणजे त्यांच्या प्रवासाच्या अधिकारावर विनाकारण निर्बंध आणणे आहे. तंत्रज्ञानाचा बडगा उगारून सामान्य नागरिकांच्या जगण्यातील सहजता हिरावून घेतली जात आहे. ग्रामीण संस्कृतीशी विसंगत असणारे असे निर्णय लादताना जनतेच्या अडचणींचा साधा विचारही केला जात नाही, ही अत्यंत संतापजनक बाब आहे. आधीच तोट्यात चाललेल्या एस.टी. महामंडळाला रुळावर आणण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याऐवजी, सामान्य प्रवाशांच्या खिशाला वारंवार कात्री लावण्याचे उद्योग महामंडळ करत आहे. २०० रुपयांचे शुल्क गोळा करून कोट्यवधी रुपयांची उलाढाल नेमकी कुणाच्या घशात घातली जात आहे? या कार्डच्या निर्मितीमागे आणि वितरणामागे असणारी कंत्राटशाही नेमकी कोणाची लाभाची भाकरी भाजत आहे, याचे उत्तर आज त्रस्त प्रवाशांना हवे आहे. सवलती देणे हा काही उपकार नाही, तर तो लोककल्याणकारी राज्याचा अधिकार आणि कर्तव्य आहे. परंतु, जेव्हा कर्तव्य बाजूला सारून व्यापारी वृत्तीने निर्णय घेतले जातात, तेव्हा लोकशाही व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास उडू लागतो.

आज एसटी ही ग्रामीण महाराष्ट्राची जीवनवाहिनी मानली जाते. शेतातला शेतकरी असो, शिक्षणासाठी जाणारी मुलगी असो किंवा शहरात वैद्यकीय उपचारांसाठी जाणारा रुग्ण असो, एस.टी. हेच त्यांचे एकमेव भरवशाचे वाहन आहे. याच प्रवाशांना आर्थिक अडचणीत आणून जर शासनाला विकास साधायचा असेल, तर तो विकास नसून सर्वसामान्यांची पिळवणूक आहे. निवडणुकीच्या काळात जे नेते दारे-दारे फिरून हात जोडत होते, तेच नेते आज वातानुकूलित कक्षात बसून या अन्यायकारक निर्णयांवर सही कशी करू शकतात? जनतेच्या घामाच्या कमाईवर पोसणाऱ्या यंत्रणेने हे विसरता कामा नये की सत्तेची ताकद ही जनतेच्या मतांमधूनच येते. जेव्हा जनता अन्यायाविरुद्ध एकत्र उभी राहते, तेव्हा मोठे गडसुद्धा कोलमडून पडतात. जर खरोखरच जनतेबद्दल कळवळा असेल, तर हा २०० रुपयांच्या सक्तीच्या वसुलीचा निर्णय तातडीने मागे घेतला पाहिजे. आधार कार्ड किंवा पूर्वीप्रमाणेच ओळखपत्रे ग्राह्य धरून ही सवलत विनाअट पूर्ववत सुरू ठेवली पाहिजे. गोरगरीब प्रवाशांच्या सहनशीलतेचा अंत पाहणे सरकार आणि महामंडळाने त्वरित थांबवावे, हीच या राज्यातील तमाम जनतेची आर्त हाक आहे.

## विशेष

उदयराज साऊळ

# मातीपासून मातीपर्यंत

## अनंत चतुर्दशी आणि जीवनाचे अद्भूत तत्त्वज्ञान

**महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि धार्मिक पटलावर गणेशोत्सवाचा दहावा दिवस अत्यंत भावनिक, उत्साही आणि तितकाच डोळ्यात पाणी आणणारा असतो, तो म्हणजे अनंत चतुर्दशी. भाद्रपद शुद्ध चतुर्दशीला येणारा हा सण केवळ एका उत्सवाची सांगता नसून मानवी भावना, श्रद्धा आणि निसर्गाच्या चक्राचे एक सुंदर दर्शन घडवणारा सोहळा आहे. गेल्या दहा दिवसांपासून घरोघरी आणि सार्वजनिक मंडपांत मनोभावे पूजा केलेली लाडकी बाप्पाची मूर्ती निरोपाच्या वेळी जड अंतःकरणाने विसर्जित केली जाते, तेव्हा अवघा महाराष्ट्र एकाच सुरात गणपती बाप्पा मोरिया, पुढच्या वर्षी लवकर या असा गजर करतो. या परंपरेमागे केवळ उत्सवप्रियताच नाही, तर हिंदू सनातन संस्कृतीतील विसर्जन आणि परिवर्तनाचा एक महान संदेश दडलेला आहे.**

अनंत चतुर्दशीच्या या पर्वाचे पौराणिक महत्त्व अत्यंत अगाध आहे. या दिवशी विष्णूच्या अनंत रूपाची पूजा करण्याची प्राचीन परंपरा आहे. अनंत म्हणजे ज्याला आदि नाही आणि अंतही नाही, असा परमेश्वर. महाभारत काळात पांडवांनी जुगारात सर्वस्व गमावल्यानंतर अत्यंत हलाखीचे दिवस काढले होते. अशा बिकट परिस्थितीत श्रीकृष्णाने त्यांना अनंत चतुर्दशीचे व्रत करण्याचा सल्ला दिला होता. या व्रताच्या प्रभावामुळे पांडवांना त्यांचे खोयलेले राज्य आणि वैभव पुन्हा प्राप्त झाले, अशी आख्यायिका आहे. या कथेतून हा संदेश मिळतो की माणसाच्या आयुष्यात कितीही संकटांचे काळे ढग दाटले तरी ईश्वरावरची श्रद्धा आणि कष्टाची जोड असेल, तर अनंत रूपाने परमेश्वर धावून येतो आणि जीवनाला नवी दिशा देतो.

कालांतराने या धार्मिक व्रताला लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या विसर्जनाची जोड दिली आणि या सणाचे स्वरूप अधिक व्यापक बनले. लोकमान्य टिळकांनी ज्या उद्देशाने सार्वजनिक गणेशोत्सवाची पायाभरणी केली, त्यात समाजप्रबोधन, एकात्मता आणि देशप्रेम ही मुख्य मूल्ये होती. आज अनंत चतुर्दशीच्या दिवशी जेव्हा आपण लाखांनच्या संख्येने रस्त्यांवर उतरून गणपती विसर्जन मिरवणुका काढतो, तेव्हा जात, पात, धर्म या सर्व भेदांच्या पलीकडे जाऊन अवघे समाजमन एकसंध झाले असल्याचे दिसून येते. असे असले तरीही या विसर्जन मिरवणुकांमध्ये डिजे आणि कर्णकर्कश वाद्यांना पूर्णविराम देऊन पारंपारिक अभंग, बाप्पाची भजने आणि संतांचे विचार यांची सात्विकता जपण्याची खरी गरज निर्माण झाली आहे, जेणेकरून उत्सवाचे पावित्र्य आणि सामाजिक सलोखा कायम राखता येईल. आजच्या या बदलत्या काळात तरुणांनी मौजमजेपक्षा संस्कृतीच्या संवर्धनाला प्राधान्य देणे अत्यंत आवश्यक बनले आहे. बाप्पाच्या आगमनापासून विसर्जनापर्यंतचा हा सोहळा आपल्या समृद्ध वारशाची ओळख करून देणारा असतो, त्यामुळे त्याचे पावित्र्य टिकवून ठेवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.



मात्र, या उत्सवाच्या आनंदात पर्यावरण रक्षणाचे भान राखणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे. शाडूच्या मातीच्या मूर्तींऐवजी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती आणि रासायनिक रंगांचा वाढता वापर आपल्या जलयंत्रणेवर आणि पर्यावरणावर विपरीत परिणाम करत आहे. बाप्पाला निरोप देताना निसर्गाची हानी होणार नाही, याची काळजी घेणे ही प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे. निर्माल्य विसर्जनाचे योग्य नियोजन करणे आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करणे हाच बाप्पाप्रती खरा आदर ठरेल. नदी व समुद्र किनाऱ्यांवर होणारे प्रदूषण रोखण्यासाठी प्रशासकीय पातळीवर आणि तरुण मंडळांकडून जनजागृती केली जात आहे. बाप्पाच्या विसर्जन मिरवणुकीत प्लास्टिकचा वापर टाळून पर्यावरणस्नेही साहित्याचा वापर करणे ही काळाची गरज बनली आहे. निसर्गाचे संतुलन बिघडले तर मानवाचे अस्तित्वच धोक्यात येईल, याचे भान ठेवून आता नागरिकही हळूहळू कागदी व मातीच्या मूर्तींकडे आणि इको-फ्रेंडली उपक्रमांकडे वळत आहेत, ही एक अत्यंत सकारात्मक आणि स्वागतार्ह बाब आहे. तसेच, विसर्जनस्थळी होणारी गर्दी आणि कचरा टाळण्यासाठी नागरिकांनी स्वयंशिस्तीचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करायला हवे, जेणेकरून हा उत्सव अधिक शिस्तबद्ध आणि आनंददायी पार पडेल. पर्यावरण जिवंत राहिले तरच पुढच्या वर्षी बाप्पाचे स्वागत करण्यासाठी आपली ही वसुंधरा सुरक्षित उरेल, हे विसरता कामा नये.

विसर्जन हा निसर्गाचा आणि जीवनाचा अटल नियम आहे. जे आले आहे, त्याला एक ना एक दिन जायचेच असते, हे सत्य अनंत चतुर्दशी आपल्याला शिकवते. मातीच्या मूर्तीचे पाण्यात विसर्जन होते म्हणजे ती माती पुन्हा निसर्गात विलीन होते. यातून आपल्याला अलिप्ततेचा आणि नश्वरतेचा मोठा पाठ प्राप्त होतो. कोणतीही गोष्ट शाश्वत नसते, सुख असो वा दुःख, काळ बदलत राहतो. बाप्पाच्या विसर्जनाचे दुःख जरी मनाला क्लेश देत असले, तरी पुढच्या वर्षी लवकर या हे शब्द माणसामध्ये नवी उमेद आणि आशा निर्माण करतात. हे चक्र अविरत सुरू राहते, जसा तो अनंत परमेश्वर अविरत आहे.

अनंत चतुर्दशी हा केवळ एक विधी नसून भक्ती, संस्कृती, पर्यावरण आणि सामाजिक सलोख्याचा हा एक अद्भुत संगम आहे. हा दिवस आपल्याला भूतकाळातील आठवणींना उजाळा देत भविष्याकडे सकारात्मकतेने पाहण्याची नवी ऊर्जा देतो. बाप्पाच्या निरोपाचे हे पर्व आपल्या आयुष्यातून अंधकार दूर करून ज्ञानाचा आणि प्रेमाचा प्रकाश पसरवो, याच भावनेने अवघा महाराष्ट्र या पवित्र पर्वाचा अनुभव घेत असतो. आपल्या लाडक्या बाप्पाला यंदा निरोप देताना आपण सर्वांनी पर्यावरणाचा समतोल राखून हा सण अधिक अर्थपूर्ण बनायला हवा, जेणेकरून बाप्पाची ही परंपरा भावी पिढ्यांसाठीही दीपस्तंभ ठरेल.



चित्ररंग

शरद कोरडे
मो. ९३७११८५१७४



# लोकशाहीर राम जोशी!

## व्ही. शांताराम आणि गदिमांची चौफेर कामगिरी!

**सोलापुरात जन्मलेल्या पेशवेकालीन शाहीर रामचंद्र जगन्नाथ जोशी अर्थात राम जोशी हे ब्राह्मण कुलांत जन्मले असूनही त्यांनी शाहिरी लावणी, काव्य व कीर्तन या क्षेत्रात पारंगत होऊन, पुण्यातील दुसऱ्या बाजीरावांच्या दरबारापर्यंत आपली लोकप्रियता पोहोचवली. ज्यांना साक्षात पेशव्यांच्या दरबारात आपला कार्यक्रम सादर करण्याची संधी मिळाली आणि पेशवाईची शाबासकीची थाप ज्यांच्या पाठीवर पडली, त्या राम जोशींच्या दैदीप्यमान कारकिर्दीवर सिनेमा काढावा, अशी ज्येष्ठ निर्माता, दिग्दर्शक व अभिनेते व्ही. शांताराम यांची प्रबळ इच्छा होती. स्वतःच्या 'राजकमल कला मंदिर' या संस्थेमार्फत या चित्रपटाची निर्मिती करण्याचे त्यांनी ठरविले. त्यावेळी या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची जबाबदारी त्यांचे आद्य गुरू बाबुराव पेंटर यांच्यावर सोपविण्याचे ठरवून त्यांना आपल्या गुरूंच्या ऋणातून अंशतः मुक्त व्हायचे होते.**

शांताराम बापूंचे मावस भाऊ बाबुराव पेंढारकर हे बाबुराव पेंटर यांच्या महाराष्ट्र फिल्म कंपनीत व्यवस्थापक मंडळात होते आणि तिथे अभिनेते म्हणूनही काम करत होते. घरच्या गरिबीमुळे ते बाबुरावांबरोबर वयाच्या साधारणतः १५ व्या वर्षी महाराष्ट्र फिल्म कंपनीत हरकामी कामगार म्हणून रुजू झाले. प्रथम त्यांना सुतार खात्यात साफसफाई व सामान व्यवस्थित लावण्याच्या कामावर ठेवले गेले. पुढे रंगकाम खात्यात बदली झाल्यावर ते बाबुराव पेंटर यांना साहाय्य करू लागले. तेथे बाबुराव पेंटर यांच्याकडून दिग्दर्शनाचे धडे मिळाल्यानंतर शांताराम बापूंना चित्रपटांतून छोटी-मोठी कामे करण्याची संधी मिळू लागली. १९२० सालच्या 'वत्सलाहरण' या चित्रपटात त्यांना कृष्णाची भूमिका करण्याची प्रथम संधी मिळाली. दरम्यान, ९ जून १९२२ रोजी त्यांचे कोल्हापूरच्या अंबु मुगळखोड यांच्याशी लग्न झाले, त्यावेळी त्यांचे वय २१ वर्षे होते. त्यानंतर 'सिंहगड' व 'श्रीकृष्णअवतार' या मूकपटांत त्यांनी भूमिका केल्या.

महाराष्ट्र फिल्म कंपनीच्या 'सती पद्मिनी', 'शहाला शह', 'राणा हमीर', 'माया मच्छिंद्र', 'गजगौरी' व 'भक्त प्रल्हाद' या मुकपटांत त्यांनी सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम केले. त्यानंतर १९२७ च्या 'नेताजी पालकर' या चित्रपटाचे स्वतंत्रपणे दिग्दर्शन करण्याची संधी त्यांना पेंटरांनी दिली आणि या चित्रपटाला शासनाचे पारितोषिकही मिळाले. पुढे बाबुराव पेंटर यांच्याशी काही मंडळींचे मतभेद झाल्यानंतर बाबुराव पेंढारकर, विष्णुपंत दामले व फत्तेलाल मामा यांच्यासह शांताराम बापूंनी १ जून १९३० रोजी महाराष्ट्र फिल्म कंपनी सोडून कोल्हापूर येथे 'प्रभात' कंपनीची स्थापना केली. 'गोपालकृष्ण' हा प्रभातचा पहिला मुकपट होता, ज्याचे दिग्दर्शन व्ही. शांताराम यांनी केले. त्यानंतर 'राणीसाहेब अर्थात बजरबट्टू' हा प्रभातचा पहिला बोलपट त्यांनी दिग्दर्शित केला.

पुढे व्ही. शांताराम यांनी १९४३ मध्ये 'राजकमल कला मंदिर' ही चित्रसंस्था स्थापन केली आणि याद्वारे प्रदर्शित झालेला 'शकुंतला' हा अमेरिकेत प्रदर्शित झालेला पहिला भारतीय चित्रपट मानला जातो. त्यानंतर राजकमलने 'डॉक्टर कोटणीस की अमर कहानी' हा चित्रपट १९४६ मध्ये प्रदर्शित केला. हे दोन्ही चित्रपट त्यांनीच दिग्दर्शित केल्यामुळे, राजकमलच्या तिसऱ्या 'लोकशाहीर रामजोशी' या चित्रपटाच्या दिग्दर्शनासाठी त्यांनी आपले गुरू बाबुराव पेंटर यांना आदरपूर्वक पाचारण केले. प्रकृती स्थिर नसल्याने त्यांनी प्रथम नकार दिला होता, पण शांताराम बापूंच्या खूप आग्रहामुळे व आपण स्वतः सहाय्यक दिग्दर्शक म्हणून मदत करणार असल्याचे सांगितल्यावर ते राजी झाले.

या चित्रपटासाठी गायक नट जयराम शिलेदार यांना नायक राम जोशी म्हणून व अभिनेत्री हंसा वाडकर यांना नायिका बया म्हणून करारबद्ध केले गेले. गीतकार ग. दि. माडगूळकर यांनी कथा, पटकथा व संवाद लिहिले, तसेच चित्रपटातील तीन गाणी लिहिली; इतर शाहिरी गीते राम जोशींच्याच रचनांमधून घेतली गेली. संगीतकार वसंत देसाई यांनी या चित्रपटाला संगीत दिले. चित्रीकरण सुरू असताना बाबुराव पेंटर यांची प्रकृती खालावल्यामुळे त्यांनी दिग्दर्शन सोडले आणि पुढे शांताराम बापूंनीच मागील चित्रीकरणात फेरफार करून चित्रपट पूर्ण केला. मात्र श्रेयनामावलीत दिग्दर्शक म्हणून बाबुराव पेंटर व व्ही. शांताराम अशी दोघांचीही नावे देण्यात आली.

राम जोशींचा जन्म १७६२ च्या सुमारास सोलापूर येथे एका प्रतिष्ठित व वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मण कुटुंबात झाला. आई-वडील लवकरच वारल्याने सर्व जबाबदारी मोठे बंधू मुदगुलशास्त्री यांच्यावर आली. राम जोशी अत्यंत हजरजबाबी, हौसमौज करणारे आणि संस्कृतचे अभ्यासक होते. ते धोंडी नावाच्या तमासगीर शाहिराच्या फडात जात असत. भावाने व्रतबंध विधी केल्यावर राम अधिक रागावून धोंडीच्या फडात सामील झाले, ज्यामुळे दोघांत फारकत झाली. पुढे गावातील ज्येष्ठांनी समझोता घडवून आणल्यानंतर रमा नावाच्या तरुणीशी त्यांचा विवाह करण्यात आला. परंतु, त्यांचे वर्तन न सुधारल्याने एका दिवस मुदगुलशास्त्रींनी त्यांना घर सोडण्याचा आदेश दिला.

धोंडीचा फड हा राम जोशींसाठी मुक्त विद्यापीठ ठरला. धोंडीने त्यांना तुरा (आदित्यदेव महादेव) आणि कलंगी (आदिशक्ती दुर्गामाता) यांतील भेद शिकवला. शंकर नावाच्या ढोलकीपटूंकडून रामने तालवाद्यांचे शिक्षण घेतले. बया आणि चिमा या नृत्यांगनांच्या सहवासामुळे धोंडीच्या फडाला मोठी मागणी होती. राम जोशींनी स्वतःचा फड सुरू केल्यावर त्यांच्या पहाडी आवाजामुळे व अप्रतिम वाद्य कौशल्यामुळे त्यांना मोठी प्रसिद्धी मिळाली. बया त्यांच्या लावण्या सुरेल आवाजात गात असे आणि दोघे परस्परांवर अनुरक्त झाले.

पुण्यात दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या दरबारातून रामला कार्यक्रमाचे आमंत्रण आले. पेशव्यांनी जाहीर कौतुक करून त्यांचा सन्मान केला व मानाचा शिरपेच दिला. परंतु, अवाजवी खर्च, दारूचे व्यसन आणि रंगेल वागण्यामुळे त्यांची समाजात बदनामी झाली व फडाला कर्ज झाले. नंतर शाक्त पंथाच्या जोगी आणि नाथ संप्रदायातील बैराग्यांच्या सहवासामुळे त्यांना आपल्या चुकांचे भान आले. त्यांनी फड सोडला आणि पंढरपूरला जाऊन बाबा पाध्ये यांच्याकडून काव्यशास्त्र, वेदाभ्यास व कीर्तनकला यांची दीक्षा घेतली.

यानंतर सोलापूरला येऊन त्यांनी विठ्ठल मंदिरात प्रभावी कीर्तन केले, ज्यामुळे त्यांचे मोठे बंधू मुदगुलशास्त्री आनंदित झाले आणि त्यांनी रामला घरात सन्मानाने आणले. राम जोशींचे कीर्तन संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झाले. काशीयात्रेला जात असताना प्रवासात आजाराने त्यांचे निधन झाले.

चित्रपटाच्या निर्मितीदरम्यान व्ही. शांताराम आणि ग. दि. माडगूळकर यांनी राम जोशींच्या जीवनप्रवासाला अधिक रंजक करण्यासाठी काही सिनेमॅटिक स्वातंत्र्य घेतले होते. प्रत्यक्ष इतिहासात घडलेल्या काही घटनांमध्ये चित्रपटाच्या चौकटीला सुसंगत ठरतील असे बदल करण्यात आले, ज्यायोगे प्रेक्षकांना दृश्यकलेचा उत्तम अनुभव घेता येईल. मुदगुलशास्त्रींच्या कठोर शिस्तीतून बाहेर पडून शाहिरी विश्वात रममाण झालेल्या राम जोशींचा संघर्ष, त्यांचे बहुरंगी व सुप्रसिद्ध फड जीवन, तसेच त्यांच्या आयुष्यातील उत्तरकाळातील आध्यात्मिक परिवर्तन या सर्वच टप्प्यांचे पडद्यावर अतिशय प्रभावी व जिवंत दर्शन घडवण्यात आले. हा चित्रपट केवळ एका व्यक्तीची चरित्रात्मक गाथा न राहता, तत्कालीन लोककलेचा आणि संगीत रंगभूमीचा एक सुवर्णकाळ जगासमोर उभा करणारा ऐतिहासिकदस्तऐवज ठरला. गदिमांच्या ओघवत्या संवादफेकीने आणि वसंत देसाईंच्या सुरेल व लोकसंगीतप्रधान रचनांमुळे या कलाकृतीला एक वेगळीच उंची प्राप्त झाली.

काही सिनेमॅटिक लिबर्टी घेत व्ही. शांताराम यांनी बया व चिमा यांना सुरुवातीपासूनच दाखवले आणि सोलापूरच्या प्रवासातही बया सोबत असल्याचे दाखवले. ६ डिसेंबर १९४७ रोजी प्रदर्शित झालेला हा चित्रपट पुण्याच्या वसंत टॉकीजमध्ये तब्बल ४२ आठवडे चालला आणि १९४८ च्या सुरुवातीला तो हिंदीत 'मतवाला शायर' या नावाने प्रदर्शित झाला. हा चित्रपट आजही रसिक आवर्जून पाहतात.

---



पुस्तक परिचय

प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

**विज्ञान आणि गणित विषयांची गोडी वाढवणारे आणि १३ महान शास्त्रज्ञांच्या जीवनकार्याचा वेध घेणारे प्रदीप कुलकर्णी यांचे 'असे घडले थोर शास्त्रज्ञ' हे पुस्तक मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केले आहे. या सुंदर पुस्तकाचे सविस्तर परीक्षण लेखक तथा समीक्षक प्रा. शाम जोगळेकर यांनी अत्यंत अभ्यासपूर्णरीत्या केले असून, विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी हे पुस्तक अतिशय उपयुक्त ठरते.**

**-संपादक**

## वाचनीय आणि प्रेरक

# असे घडले थोर शास्त्रज्ञ

'असे घडले थोर शास्त्रज्ञ' हे प्रदीप कुलकर्णी लिखित पुस्तक, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केले आहे. 'मनोगत'मध्ये या पुस्तकाच्या लेखनाची सूचना, प्रकाशक अशोक कोठावळे यांनी केल्याचे प्रदीप यांनी स्पष्ट केले आहे. विज्ञान आणि गणित शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी, संबंधित अवांतर वाचन केल्याने, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होते. आजच्या गतिमान वैज्ञानिक युगात विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल निर्माण करणे आवश्यक असून, हे पुस्तक त्या दृष्टीने अतिशय उपयुक्त ठरते. पुस्तकात तेरा महान शास्त्रज्ञांच्या जीवनकार्याची अत्यंत सविस्तर व प्रेरणादायी माहिती दिली आहे. समर्पक, रंगीत मुखपृष्ठ अनीश दाते यांचे असून ते पुस्तकाच्या आशयाला साजेसे आहे.

ग्रीक साम्राज्यात अनेक शास्त्रज्ञ, कलावंत आणि संशोधक निर्माण झाले. त्यामध्ये आर्किमिडीज यांचे नाव प्रामुख्याने घेतले जाते. आर्किमिडीज यांनी गणितामध्ये केलेल्या मूलभूत संशोधनामुळे, त्यांना गणितशास्त्राचा पिता मानले जाते. आर्किमिडीज (इ.स.पू. २८७-इ.स.पू.२१२) यांचा जन्म, इटलीजवळील सिसिली बेटावरील सिरॅक्युज शहरात झाला. आर्किमिडीज लहानपणापासून बुद्धिमान आणि चौकस होता. लहानपणापासूनच विज्ञान आणि गणित या विषयांची गोडी लागली. इजिप्तमधील अलेक्झांड्रिया शहरात, विविध विषयांचे शिक्षण घेऊन आर्किमिडीज सिरॅक्युजला परत आले. त्यांनी विविध प्रयोग करून निसर्गाची कोडी सोडविली. त्यासाठी गणिताचा आधार घेतला. तरफेचा वापर करून अवजड वस्तू कमी बलाचा वापर करून उचलता येतात, हा शोध त्यांनी लावला. दोन किंवा जास्त कप्प्यांच्या जोडणीतून, प्रचंड यांत्रिक शक्ती निर्माण होऊ शकते, याचाही शोध लावला. आर्किमिडीज यांच्या जीवनकाळातील युरेका युरेका या प्रसिद्ध आख्यायिकेचे सविस्तर विवेचन प्रदीप यांनी केले आहे.

सोळाव्या शतकात इटलीमध्ये गॅलिलिओ गॅलिली हा प्रतिभावंत आणि प्रयोगशील शास्त्रज्ञ जन्माला आला. गॅलिलिओ यांना प्रयोग करून प्रत्येक गोष्ट सिद्ध करण्याची सवय होती. त्यांनी आधुनिक वैज्ञानिक पद्धतीचा पाया घालण्याचे महान कार्य केले. विविध प्रयोग करून आणि गणिताचा वापर करून त्यांनी निसर्गाची अनेक रहस्ये शोधून काढली. गॅलिलिओ यांनी या विश्वाच्या केंद्रस्थानी पृथ्वी नसून सूर्य आहे आणि सूर्य पृथ्वीभोवती फिरत नसून पृथ्वी सूर्याभोवती फिरते, असे मत ठामपणे मांडले. कालांतराने कोपर्निकस यांनी या मताला दुजोरा दिला. त्यावेळेच्या ख्रिश्चन धर्मप्रमुखांना हे अमान्य असल्याने, गॅलिलिओ यांना एकांतवासाची कठोर शिक्षा दिली गेली. मोतीबिंदू, काचबिंदू या विकारांमुळे, १६३८ मध्ये ते पूर्णपणे अंध झाले. गॅलिलिओ गॅलिली (१५-२-१५६४ / ८-१-१६४२) यांनी यांत्रिकी, गती, ध्वनी, प्रकाश आणि खगोलशास्त्र या सर्व विषयांत मूलभूत संशोधन केले.

आयझॅक न्यूटन (२५-१२-१६४२ / ३१-३-१७२७) यांचा जन्म, लंडनपासून शंभर मैलांवर असलेल्या वुलस्थॉर्प या गावात झाला. शालेय शिक्षणानंतर केंब्रिज विद्यापीठाच्या ट्रिनिटी कॉलेजात त्यांनी उच्च शिक्षण घेतले. प्रकाशकिरण पांढरा दिसला तरी तो सात रंगांचा बनलेला असतो, हा प्रकाशाचा गुणधर्म सिद्ध करणारे न्यूटन हे पहिले शास्त्रज्ञ होते. न्यूटन यांनी गुरुत्वाकर्षण आणि गतीचे नियम यांचा शोध लावला. त्यांनी अंतर्गोल आरशांचा वापर करून जगातील पहिली दुर्बीण बनवली. न्यूटन यांनी त्यांच्या आधीच्या काळातील सर्व महान शास्त्रज्ञांचे ऋण मान्य करताना कृतज्ञतेने म्हटले होते, 'पूर्वी होऊन गेलेल्या शास्त्रज्ञांच्या खांद्यावर उभा राहिल्यामुळे त्यांच्यापेक्षा मी अधिक दूरवरचे बघू शकलो!'

मायकल फॅरेडे (२२-९-१७९१ / २५-८-१८६७) यांनी घरच्या गरिबीमुळे आणि शाळेत चांगली वागणूक न मिळाल्यामुळे, वयाच्या तेराव्या वर्षी शाळा सोडली. सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ सर हंफ्री डेव्ही यांच्याबरोबर काम करण्याची फॅरेडे यांना संधी मिळाली. चुंबकीय शक्तीचा वापर करून वीज निर्मिती करता येते, हे प्रथमच फॅरेडे यांनी प्रयोगातून सिद्ध केले. ते शास्त्रज्ञ म्हणून श्रेष्ठ होते, तसेच त्यांची जीवनातल्या उच्च मूल्यांवर श्रद्धा असल्याने ते माणूस म्हणूनही थोर होते.

अल्बर्ट आईन्स्टाईन (१४-३-१८७९ / १८-४-१९५५) यांचा जन्म जर्मनीतील, उल्म नावाच्या छोट्याशा गावात, ज्यू कुटुंबात झाला. त्यांच्या सापेक्षतावादाच्या सिद्धांतामुळे वैज्ञानिक जगतामध्ये खळबळ उडाली. आईन्स्टाईन हे प्रयोगशील शास्त्रज्ञ नव्हते, तर तरल बुद्धिमत्ता, तर्कशुद्ध विचार, अफाट कल्पनाशक्ती यांच्या जोरावर संशोधन करत.




१९३३ साली जर्मनीमध्ये हिटलरची नाझी राजवट आल्यानंतर, ते जर्मनी सोडून अमेरिकेतील प्रिन्स्टन या शहरी कायमचे स्थलांतरित झाले.

मारी क्युरी (७-११-१८६७ / ४-७-१९३४) यांचा जन्म पोलंडच्या राजधानीत, वॉर्सा येथे झाला. रेडियम आणि पोलोनियम या मूलद्रव्यांच्या किरणोत्सर्गाच्या संदर्भात केलेल्या महत्त्वपूर्ण संशोधनाबद्दल १९०३ साली क्युरी दाम्पत्याला भौतिकशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळाले. मारी क्युरी यांना १९११ सालचे रसायनशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळाले. पहिल्या महायुद्धाच्या काळात जखमी सैनिकांच्या उपचाराची दिशा ठरवण्यासाठी मारी यांनी फिरती क्ष-किरणयंत्रे बनवून घेतली व अनेक सैनिकांचे प्राण वाचवले.

नील्स बोर (७-१०-१८८५ / १८-११-१९६२) यांचा जन्म डेन्मार्कमधील कोपनहेगन येथे झाला. बोर यांनी अणुच्या अंतर्गत रचनेचा जटिल प्रश्न पूर्णपणे सोडवला. याविषयी केलेल्या मूलभूत संशोधनाबद्दल त्यांना १९२२ साली भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्कार देण्यात आला. अणुशक्तीचा वापर विधायक कामांसाठीच केला पाहिजे, हा संदेश त्यांनी जगभर पोहोचवला.

सी.व्ही.रामन (७-११-१८८८ / २१-१९-१९७०) यांचा जन्म मद्रास प्रांतातल्या, तिरुचिरापल्ली (त्रिची) येथे झाला. भौतिकशास्त्राच्या व रसायनशास्त्राच्या दृष्टीने रामन परिणाम हा अत्यंत महत्त्वाचा शोध लावल्याबद्दल, रामन यांना नोबेल पारितोषिक (१९३०) दिले गेले. १९५४ साली भारतरत्न हा भारतातील सर्वोच्च नागरी पुरस्कार त्यांना दिला गेला. सी.व्ही.रामन यांनी भारताच्या वैज्ञानिक प्रगतीचा पाया घातला.

होमी भाभा (३०-१०-१९०९ / २४-१-१९६६) यांचा जन्म मुंबईतील एका सुसंस्कृत, सुशिक्षित, संपन्न पारशी कुटुंबात झाला. भाभा- हाइटलर-कास्केड सिद्धांत या महत्त्वपूर्ण संशोधनामुळे त्यांना जगभर मान्यता मिळाली. १-६-१९४५ रोजी मुंबईत टाटा मूलभूत संशोधन संस्था स्थापन झाली व होमी भाभा या संस्थेचे संचालक होते. पं. नेहरू आणि भाभा यांच्या सहकार्यातून, अणुशक्तीचा वापर शांततेसाठी व विधायक कार्यांसाठीच करण्याचे ठरले. होमी भाभा यांच्या सूचनेनुसार इलेक्ट्रॉनिक्स कार्पोरेशन ऑफ इंडियाची स्थापना केली गेली.

थॉमस अल्वा एडिसन (११-२-१८४७ / १८-१०-१९३१) यांचा जन्म अमेरिकेतील ओहाओ राज्यातील मिलान शहरात झाला. तीव्र स्मरणशक्ती आणि कुशाग्र बुद्धिमत्ता यांच्या जोरावर एडिसन यांनी हजारपेक्षा जास्त पेटंट्स घेतली. वीज पुरवठा करण्यासाठी लागणाऱ्या साहित्याची निर्मिती करण्यासाठी स्वतःची कंपनी स्थापन केली व कोट्यवधी लोकांचे जीवन समृद्ध केले.

लुई पाश्चर (२७-१२-१८२२ / २८-९-१८९५) यांनी वेगवेगळ्या अतिसुक्ष्म जंतूंमुळे माणसाला आणि प्राण्यांना आजार होतात, हे सिद्ध केले. पाश्चरायझेशनची पद्धत शोधून काढली आणि रोगप्रतिकारशास्त्र (इम्युनॉलॉजी) या शाखेचा पाया घातला.

अलेक्झांडर फ्लेमिंग (६-८-१८८१ / ११-३-१९५५) यांनी १९२८ मध्ये पेनिसिलिन या जगातील पहिल्या प्रतिजैविकाचा शोध लावला. पेनिसिलीनच्या शोधाबद्दल त्यांना १९४५ साली नोबेल पारितोषिक विभागून देण्यात आले.

श्रीनिवास रामानुजन (२२-१२-१८८७ / २६.४.१९२०) हे मद्रास पासून १६० मैलांवर असलेल्या कुंभकोणम या गावचे रहिवासी. तल्लख बुद्धिमत्ता असल्याने त्याला गणितामध्ये नेहमी १०० पैकी १०० गुण मिळत. कॉलेजमध्ये ते सतत गणिताचा अभ्यास करत. मात्र अन्य विषयांत त्यांची प्रगती नसल्यामुळे त्यांना पदवी मिळाली नाही. त्यांनी प्रामुख्याने नंबर थिअरी या विषयावर मूलभूत संशोधन केले. त्यांच्या या संशोधनाची माहिती त्यांच्या वरिष्ठांनी, त्यांचे संशोधन इंग्लंडमधील नामवंत गणितज्ञ, जी.एच. हार्डी यांना पाठवले. हार्डी यांनी रामानुजन यांच्या संशोधनाचे महत्त्व जाणले, त्यांना इंग्लंडला बोलावून घेतले. त्यांच्या वह्यांचा तेथील गणितज्ञांनी बारकाईने अभ्यास केला. रामानुजन यांनी केलेल्या संशोधनाचे महत्त्व विचारात घेऊन केंब्रिज विद्यापीठाने १९१६ मध्ये त्यांना बी.ए.ची पदवी दिली.१९१८ मध्ये रामानुजन यांना रॉयल सोसायटीचा व ट्रिनिटीचा -फेलो होण्याचा बहुमान मिळाला. मात्र लंडनच्या थंड हवेमुळे, विशिष्ट आहाराच्या हट्टामुळे, तब्येतीकडे झालेल्या दुर्लक्षामुळे त्यांचे निधन झाले.

असे घडले थोर शास्त्रज्ञ, या पुस्तकाद्वारे प्रदीप कुलकर्णी यांनी जगातील श्रेष्ठ शास्त्रज्ञांची, सुयोग्य कृष्णधवल आणि रंगीत छायाचित्रे, आकृत्या यांच्या साहाय्याने, सविस्तर ओळख करून दिली आहे. या महान शास्त्रज्ञांनी स्वहिताला, संपत्तीला महत्त्व न देता, संपूर्ण मानव जातीच्या हिताचा विचार केला होता. मानवाच्या कल्याणात त्यामुळे निश्चितच वाढ झाली आहे. मलपृष्ठावर डॉ. विवेक पाटकर यांनी या पुस्तकाचे महत्त्व स्पष्ट केले आहे. प्रदीप कुलकर्णी यांचा, सचित्र परिचय शेवटी दिला आहे. हे पुस्तक विद्यार्थी, शिक्षक आणि सर्व सुजाण नागरिक यांच्यासाठी वाचनीय, प्रेरक आणि संग्राह्य ठरणारे आहे.

**पुस्तकाचे नाव : असे घडले थोर शास्त्रज्ञ**
**लेखक : प्रदीप कुलकर्णी**
**प्रकाशक: मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, गिरगाव**
**पृष्ठे : १७०. मूल्य : रु.३००/-**

# एसटी महामंडळाच्या ताफ्यात दाखल होणार २०० अत्याधुनिक व्होल्वो बसेस

**मुंबई, कोकणनामा वृत्त- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) लांब पल्ल्याचा प्रवास करणाऱ्या आणि विशेषतः खासगी ट्रॅव्हल्सच्या बसगाड्यांना प्राधान्य देणाऱ्या प्रवाशांसाठी एक अत्यंत महत्त्वाचे आणि दूरगामी पाऊल उचलले आहे. एसटीच्या ताफ्यात तब्बल २०० अत्याधुनिक व्होल्वो बसेस दाखल करण्यासाठी सध्या निविदा प्रक्रिया वेगात सुरू करण्यात आली असून, याद्वारे प्रवाशांना अत्यंत दर्जेदार, आरामदायी आणि अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या संपूर्ण प्रकल्पांतर्गत प्रवाशांसाठी आरामदायक आसनव्यवस्था, ऑनलाईन बुकिंगची सोय आणि खासगी संस्थेच्या माध्यमातून आदरातिथ्य व्यवस्थापन यांसारख्या विविध सुविधांचा लाभ मिळणार आहे.**




एसटी महामंडळाने आपला एकूण ताफा २० हजारांपर्यंत नेण्याचे आणि प्रवाशांच्या मागणीनुसार मागेल त्याला गाडी उपलब्ध करून देण्याचे महत्त्वाकांक्षी नियोजन केले आहे. सद्यस्थितीत पाच हजार साध्या बसगाड्यांच्या निविदेची प्रक्रिया पूर्ण झाली असून, यासाठी टाटा मोटर्सने सर्वात कमी दराची बोली लावली आहे. यामुळे बसच्या गुणवत्तेबाबत कोणत्याही प्रकारची तडजोड केली जाणार नाही, याची दक्षता महामंडळाने घेतली आहे. याचबरोबर, २ बाय २च्या दोन हजार ६४० आणि ३ बाय ३च्या तीन हजार बसगाड्या ताफ्यात दाखल करण्याची प्रक्रिया देखील सध्या अंतिम टप्प्यात पोहोचली आहे.

या नवीन २०० व्होल्वो बसेसच्या नियोजनाबाबत बोलताना, १७० उतनी आसनी बसेससाठी सुमारे ७९७.३३ कोटी रुपयांची बोली लागली आहे, तर ३० शयनयान (स्लीपर) बसेससाठी १४९.५२ कोटी रुपयांची बोली लागली असल्याची माहिती समोर आली आहे. साधारणपणे २५० किलोमीटरपेक्षा अधिक अंतर आणि पाच ते सहा तासांच्या प्रवासासाठी या आरामदायक ४५ आसनी बसेस अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. तसेच रात्रीच्या लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी ३० किंवा ४५ शयनयान क्षमतेच्या बसेस देखील उपलब्ध करून देण्याचे नियोजन महामंडळाने केले आहे. दिवस आणि रात्रीच्या वेळी प्रवास करणाऱ्या प्रवाशांना त्यांच्या गरजेनुसार ही उत्तम सेवा मिळवून दिली जाणार आहे. एसटीच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या संख्येने व्होल्वो बसेस ताफ्यात दाखल होत असल्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले आहे.

राज्यासह आंतरराज्य मार्गांवर खासगी आराम बसला असणारी मागणी लक्षात घेऊन महामंडळाने अत्यंत अभ्यासपूर्ण मार्गांची निवड केली आहे. प्रवासी संख्या, लोकांची मागणी, उपलब्ध सेवा, अंतर आणि प्रवासाचा कालावधी या सर्व महत्त्वाच्या निकषांचा सखोल अभ्यास करून सर्वाधिक मागणी असलेल्या मार्गांवरच या व्होल्वो बसगाड्या धावत्या केल्या जाणार आहेत. वातानुकूलित सुविधा, आरामदायक आसने आणि रात्रीच्या प्रवासातील उत्तम सोयींमुळे आज मोठ्या प्रमाणावर प्रवाशांचा वर्ग खासगी बससेवेकडे आकर्षित होत असतो. अधिक भाडे मोजूनही हा वर्ग जर खासगी वाहनांना प्राधान्य देत असेल, तर अशा प्रवाशांना केवळ स्वस्त पर्याय देण्याऐवजी उत्तम आराम, सुरक्षितता, आधुनिक डिजिटल सुविधा आणि एक अत्यंत विश्वासार्ह सेवेचा एकत्रित अनुभव एसटीच्या माध्यमातून देण्याचा महामंडळाचा प्रयत्न आहे.

या नवीन व्होल्वो बस सेवेचा लाभ घेण्यासाठी डिजिटल बुकिंगवर विशेष भर देण्यात येणार आहे. एसटीच्या अधिकृत ऑनलाईन आरक्षण व्यवस्थेसोबतच आता विविध खाजगी डिजिटल ट्रॅव्हल प्लॅटफॉर्मवरूनही तिकीट आरक्षित करण्याची सोय प्रवाशांसाठी उपलब्ध करून दिली जाणार आहे. यामुळे प्रवाशांना बसस्थानकावर प्रत्यक्ष जाऊन तिकीट काढण्याची गरज उरणार नाही. मोबाईलच्या एका क्लिकवर बसचा मार्ग, प्रवासाची वेळ आणि उपलब्ध आसनांची अचूक माहिती मिळवून प्रवाशांना घरबसल्या आपले आरक्षण करता येणार आहे.

याशिवाय, प्रवाशांना नव्या बसगाड्यांमध्ये चक्क खासगी ट्रॅव्हल्सच्या धर्तीवरचा उच्च-स्तरीय प्रवास अनुभव प्राप्त व्हावा, यासाठी विशेष खबरदारी घेतली जात आहे. आदरातिथ्य व्यवस्थेची संपूर्ण काळजी घेण्यासाठी खासगी संस्थेची मदत घेतली जाणार असून, प्रवाशांचे स्वागत, बसमधील स्वच्छता, मूलभूत सुविधा, आवश्यक ती माहिती आणि एकूणच सेवांचे उत्तम व्यवस्थापन करण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ तैनात केले जाणार आहे. यामुळे आगामी काळात एसटीचा लांब पल्ल्याचा प्रवास अधिक सुखकर, सुरक्षित आणि प्रवाशांच्या पसंतीस उतरणारा ठरेल यात शंका नाही.

# पोलिसांमध्ये लाचखोरी वाढली, एसीबीच्या कारवाईत उघड




**मुंबई, कोकणनामा वृत्त- राज्यभरात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) केलेल्या धडक कारवायांमधून एक खळबळजनक बाब समोर आली आहे. गेल्या साडेसहा महिन्यांत राज्यभरात ५३१ सापळे रचण्यात आले असून, यादरम्यान ७५८ संशयितांकडून तब्बल तीन कोटी तीन लाख ५९ हजार २७२ रुपयांची लाच घेतल्याचे उघडकीस आले आहे. या वाढत्या लाचखोरीमध्ये पोलिसांचा विभाग सर्वात आघाडीवर असल्याचे स्पष्ट झाले आहे.**

एसीबीच्या आकडेवारीनुसार, राज्य पोलिसांच्या विविध विभागांमध्ये ८३ प्रकरणांत १३१ संशयितांनी ६९ लाख चार हजार २०० रुपयांची लाचखोरी केल्याचे निष्पन्न झाले आहे. या पाठोपाठ वन विभाग दुसऱ्या क्रमांकावर आहे. महसूल, भूमी अभिलेख व नोंदणी विभागात सर्वाधिक लाचखोरांची नोंद झाली असून, रकमेच्या बाबतीत मात्र हा विभाग तिसऱ्या क्रमांकावर आहे.

विभानिहाय आकडेवारी पाहता, वर्ग एकच्या ५२ अधिकाऱ्यांनी ४० लाख ३१ हजार शंभर रुपये, वर्ग दोनच्या ९२ अधिकाऱ्यांनी आठ लाख ४४ हजार ३५० रुपये आणि वर्ग तीनच्या ३७५ कर्मचाऱ्यांनी दोन कोटी २० लाख ८५ हजार वीस रुपयांची लाच घेतली आहे. तसेच, वर्ग चारच्या २९ कर्मचाऱ्यांनी तीन लाख तीन हजार ६०० रुपये आणि ८१ सार्वजनिक सेवकांनी २४ लाख ३५ हजार ५५२ रुपये लाच घेतल्याचे समोर आले आहे. याशिवाय, १२९ खासगी व्यक्तींनी सहा लाख ९ हजार ६५० रुपयांची लाच स्वीकारल्याची नोंद एसीबीने केली आहे.

नाशिक परिक्षेत्रात सर्वाधिक ११३ सापळे रचून १७७ संशयित आढळले आहेत, तर ठाण्यात १०२ गुन्ह्यांत १३१, छत्रपती संभाजीनगरमध्ये ८३ गुन्ह्यांत १०९, पुण्यात ७५ गुन्ह्यांत ९२, अमरावतीत ५४ गुन्ह्यांत ७५, नांदेडमध्ये ५४ गुन्ह्यांत ४२, नागपूरमध्ये ८८ गुन्ह्यांत ६९ आणि मुंबई परिक्षेत्रात सर्वात कमी २७ गुन्ह्यांत ४१ संशयित निष्पन्न झाले आहेत. दुसरीकडे, बंदर, कौशल्य विकास व महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळ या विभागांमध्ये मात्र या कालावधीत एकही लाचखोरीचा गुन्हा नोंदवला गेला नसल्याने तिथे लाचखोरीची रक्कम शून्य असल्याचे नोंदवले गेले आहे. याशिवाय राज्य परिवहन मंडळ, जलसंपदा, समाजकल्याण, सहकार व पणन, नगर परिषद, राज्य उत्पादन शुल्क आणि पाणीपुरवठा यांसारख्या विविध विभागांमध्येही लाचखोरीची प्रकरणे उघडकीस आली आहेत.

# ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले व स्वयम् योजनेच्या प्रवेश अर्जाला ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**रायगड-अलिबाग, शासकीय वसतिगृह योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार (OBC/SBC/VJNT/NT-A, B, D) आणि पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजनेअंतर्गत (NT-C) ऑनलाईन अर्ज करताना येणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे, व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमांच्या नवीन विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज सादर करण्यास ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक सुनील जाधव यांनी दिली आहे.**

इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी १२ वी नंतर सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात व्यावसायिक व अव्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या योजना राबविण्यात येतात. या योजनांच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी **https://hmasnew.mahait.org** ही वसतिगृह प्रवेश प्रणाली कार्यन्वित करण्यात आली आहे.

मागील काही दिवसांत राज्यातील अनेक विद्यार्थी तांत्रिक अडचणींमुळे मुदतीत अर्ज करू शकले नव्हते. या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी विभागाने हा अत्यंत महत्त्वाचा आणि विद्यार्थ्याभिमुख निर्णय घेतला आहे. या मुदतवाढीमुळे ग्रामीण भागातील व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील गरजू विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, अधिकाधिक पात्र विद्यार्थ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत अर्ज करण्यासाठी विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, मागील वर्षाची गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, आधार कार्ड आणि प्रवेश घेतल्याचे शुल्क पावती यांसारखी आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे बंधनकारक असणार आहे.

राज्यातील पात्र विद्यार्थ्यांसाठी वरील योजनांचे प्रवेश सुरू करण्यात आले आहेत. ऑनलाईन अर्ज सादर करताना काही तांत्रिक अडचण आल्यास विद्यार्थ्यांनी सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, रायगड-अलिबाग या कार्यालयाशी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# भाकरवडमध्ये बाप्पांच्या साक्षीने रंगले आगळेवेगळे कवी संमेलन

**भाकरवड, कोकणनामा वृत्त- गणेशोत्सवाच्या चैतन्यमय वातावरणात आणि बाप्पांच्या साक्षीने अलिबागच्या भाकरवडमध्ये साहित्याचा अनोखा संगम पाहायला मिळाला. निमित्त होते, नरेश पाटील यांच्या निवासस्थानी आयोजित विशेष गणपती बाप्पाविशेष कवी संमेलनाचे! गुरुवार, दिनांक १७ सप्टेंबर २०२६ रोजी पार पडलेल्या या संमेलनाने केवळ काव्यप्रेमींचे मन जिंकले नाही, तर सामाजिक प्रश्नांवर परखड बोटही ठेवले.**

गणेशाचे पूजन, श्रीफळ वाढवून आणि गणरायाला वंदन करून कार्यक्रमाची मंगलमय सुरुवात झाली. प्रास्ताविकात कार्यक्रमप्रमुख नरेश पाटील यांनी सर्व उपस्थितांचे मनःपूर्वक स्वागत केले. या विशेष सोहळ्यात नरेश पाटील यांच्या लेखणीतून साकारलेल्या श्री गणेशाची षोडशोपचार पूजा या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या शुभहस्ते थाटात पार पडले.



या साहित्यिक संमेलनाला अलिबाग परिसरातील अनेक दिग्गज मान्यवर उपस्थित होते. यात अखिल भारतीय आगरी साहित्य संस्था, अलिबागचे अध्यक्ष कैलास पिंगळे, रायगड भूषण एल.बी. पाटील, सदानंद ठाकूर, रामचंद्र म्हात्रे, उरण शाखा अध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे, कवी रमण पंडित, शिवप्रसाद पंडित, दिलीप मोकल, अमृत जुईकर, प्रकाश पाटील, कवी मोहन पाटील, प्रकाश मिसाळ, आदर्श शिक्षक, कवी नरेश पाटील, राजाराम भगत, संजीव पाटील, शिक्षक महेंद्र पाटील, निवृत्त पोलिस उपनिरीक्षक दिलीप पाटील, राजेंद्र पाटील, दयानंद म्हात्रे, विनायक पाटील आदींचा समावेश होता. नरेश पाटील परिवाराकडून या सर्व उपस्थित प्रतिभावंतांचा सन्मान करण्यात आला.

संमेलनात उपस्थितांनी केवळ काव्यवाचनच केले नाही, तर समाजमनाला आरसा दाखवणारे ज्वलंत प्रश्न कवितेच्या माध्यमातून मांडले. स्मार्ट मीटर, वाढीव वीज बिल, रखडलेला मुंबई-गोवा महामार्ग, ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरवस्था आणि वाढते प्रदूषण यांसारख्या गंभीर विषयांवर कवींनी गणरायाला साद घातली. विशेषतः, बिकट रस्त्यांमुळे होणारे अपघात आणि प्रवाशांचे हाल यावर भावनिक होत ''रस्ता खड्ड्यात की खड्डा रस्त्यात' असा सवाल कवींनी आपल्या रचनांमधून उपस्थित केला. याशिवाय, काहींनी गणेशोत्सवावर सुमधुर गीते गाऊन वातावरण भक्तिमय केले. या सर्व काव्यप्रवासाला पत्रकार जीवन दत्तात्रेय पाटील यांनी आपल्या मृदुंगाच्या तालावर सुरेख साथ दिली.

माणसाला जोडणारा खरा धागा म्हणजे माणूसपण असून, कवितेतून समाजात चांगला संदेश गेला पाहिजे, असा सूर यावेळी उमटला. विचारांची उंची आणि खोली वाढायला हवी, यावर जोर देत विसर्जन मिरवणुकीतील डिजेच्या अनिर्बंध वापरावर बंदी घालण्याची आक्रमक भूमिकाही मान्यवरांनी आपल्या मनोगतातून मांडली.




**कोकणनामा** हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक उमाजी म. केळुसकर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा.लि., डब्ल्यू-२३०, टीसीसी इंडस्ट्रीयल एरिया, खैरणे, नवी मुंबई जि.ठाणे, ४००७१०, महाराष्ट्र येथे छापून ए-१०१, पहिला मजला, गंगाधर को-ऑप. हाऊसिंग सोसायटी, चेंढरे-अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२ २०१ येथून प्रकाशित केले. मो. ९०११३६०१६८.
**RNI Regi. No. MAHMAR/2012/48580. Email : kokannama12@gmail.com**